I J R S S I S,Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 430-435
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No.: MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# भारतातील गुन्हेगारी समस्येचा समाजशास्त्रीय अध्ययन

डी.जी.म्हशाखेत्री
समाजशास्त्र विभाग प्रमुख, कर्मवीर दादासाहेब देतवळे महाविद्यालय, चामोर्शी त. चामोर्शी जि. गडचिरोली.

| Communicated : 02.01.2023 | Revision :08.01.2023<br>Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023 |
| --- | --- | --- |

**सारांश :**
गुन्हेगारी ही समस्या व्यक्ती व समाज यांच्या दृष्टीने एक सामाजिक घटना आहे. गुन्हेगारी समस्याही मानवी समाजात प्राचिन काळापासून निर्माण झालेली आहे. त्यामुळे गुन्ह्याचा अभ्यास विविध सामाजिक शास्त्रांमध्ये केला जातो.

गुन्हेगारीचा सर्वांगीन अभ्यास करणारे शास्त्र म्हणून "अपराधशास्त्र' किंवा "गुन्हेशास्त्र' (Criminology) हे स्वतंत्र शास्त्र विकसित झालेले आहे. प्रत्येक समाजातील मुल्यव्यवस्था वेगवेगळी निर्माण झालेली आहे. या मुल्यव्यवस्थेनुसार समाजातील प्रत्येक घटकांनी वर्तन व्यवहार करावे अशी प्रत्येक समाजाची अपेक्षा असते. या समाजमान्य मुल्यव्यवस्थेविरूध्द एखादया व्यक्तीने वर्तन केल्यास ते समाजाच्या दृष्टीने गुन्हा ठरते व त्या व्यकीला गुन्हेगार ठरविले जाते. अशा गुन्हेगाराला समाजाद्वारे शिक्षासुध्दा ठरविलेली असते.

गुन्हेगारी या समस्येचा भारतीय समाजापुरता विचार केल्यास असे लक्षात येते की, पुर्वी समाजात धर्माचा प्रभाव अधिक होता. त्या —त्या धर्मानुसार व्यक्तीने वर्तन करणे बंधनकारक होते. धर्माविरूध्द वर्तन करणे म्हणजे पाप समजले जायचे. त्याकाळी धर्म हे समाजनियंत्रणाचे प्रभावी माध्यम होते. परंतू आधुनिक काळात धर्माचा प्रभाव कमी झाला व विविध कायद्यांची निर्मीती झाली. या कयदेव्यवस्थेत कायदाविरोधी वर्तन गुन्हामानले जाते व गुन्हा करणारी व्यक्ती गुन्हेगार संबोधली जाते.

देशातील दारिद्रय, बेरोजगारी या सारख्या समस्येप्रमाणे गुन्हेगारीही एक सामाजिक समस्या बनलेली आहे. गुन्हेगारी ही केवळ भारतातीलच नाही तर जागतीक समस्या बनलेली आहे. भारतातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी भारत सरकारने वेळोवेळी कायद्याची निर्मिती केलेली आहे. परंतू कायद्यांची अंमलबजावणी प्रमाणिकपणे होणे गरजेचे आहे. तसेच गुन्हेगाराकडे आधुनिक काळात मानवतेच्या दृष्टीकोणातून पाहिले जात आहे.

**बिजसंज्ञा:–** गुन्हेगारी गुन्हेशास्त्र सायबर गुन्हे बेकारी

**प्रस्तावना :**

गुन्हेगारी ही समस्या व्यक्ती व समाज यांच्या दृष्टीने एक सामाजिक घटना आहे. गुन्हेगारी समस्या ही मानवी समाजात प्राचिन काळापासून निर्माण झालेली आहे. त्यामुळे गुन्ह्याचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणून अपराधशास्त्र किंवा गुन्हेशास्त्र (Criminology) हे स्वतंत्र शास्त्र विकसित झालेले आहे. प्रत्येक समाजात व्यक्तिच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध प्रमाणके व कायदे असतात. आपल्या सामाजिक जीवनात प्रत्येक व्यक्तीने आपल्या समाजातील मूल्यवस्थेनुसार वर्तन करावे अशी प्रत्येक समाजाची अपेक्षा असते. परंतू जेव्हा व्यक्तीकडून समाजातील मूल्यांचा, प्रमाणकांचा व कायद्याचा उलंघन होतो तेव्हा ते समाजाच्या दृष्टिने गुन्हा ठरते व त्या व्यक्तीला गुन्हेगार ठरविले जाते. गुन्हेगार व्यक्तीला समाजाद्वारे दंड किंवा शिक्षा देण्याची व्यवस्था सुध्दा केलेली असते.

गुन्हेगारी या समस्येचा भारतीय समाजापुरता विचार केल्यास असे लक्षात येते की, पूर्वी धर्म व्यवस्थेचा प्रभाव समाजात अधिक होता. धर्माविरूध्द वर्तन व व्यवहार करणे म्हणजे गुन्हा समजले जात होते. त्या काळी धर्म हे समाज नियंत्रणाचे प्रभावी माध्यम होते. परंतु आधुनिक काळातील कायदेव्यवस्थेमुळे धर्माचा प्रभाव कमी झाला. या कायद्याद्वारे समाजात सामाजिक नियंत्रणाचे कार्य पार पाडले जाते. या कायद्यानुसार कायदेविरूध्द वर्तन

म्हणजे गुन्हा मानले जाते व गुन्हा करणारी व्यक्ती गुन्हेगार संबोधले जाते. अशा गुन्हेगारांना कायद्यातील तरतुदीनुसार शिक्षेची तरतुद केली आहे. म्हणजेच कायद्याचे उल्लंघन म्हणजे गुन्हा होय. प्राचिन काळापासून अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, समाजात गुन्हा हा काही व्यक्तींकडून घडणारी प्रक्रिया आहे.

देशातील दारिद्र्य, बेरोजगारी या सारख्या समस्यांप्रमाणे गुन्हेगारी ही एक सामाजिक समस्या बनलेली आहे. गुन्हेगारी ही समस्या केवळ भारतातीलच नाहीतर जागतिक समस्या बनली आहे. भारतातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी भारत सरकारने वेळोवेळी विविध कायद्यांची निर्मिती केलेली आहे. या कायद्यांची अंमलबजावणी तेवढयाच प्रभाविपणे व प्रामाणिक होणे गरजेचे आहे. मात्र आधुनिक काळात गुन्हेगारांकडे मानवतेच्या दृष्टीकोणातून पाहिले जात आहे.

गुन्हेगारी दिवसेंदिवस अनेक क्षेत्रात आढळुन येते. गुन्हेगारीचे क्षेत्र विस्तारीत होतांना दिसते. यात अनेक प्रकारच्या गुन्हयांचा समावेश होतो. उदा. गंभीर गुन्हे, सामान्य गुन्हे, पांढरेपेशीय गुन्हे, आर्थिक गुन्हे, लौगिक गुन्हे, राजकीय गुन्हे, सायबर गुन्हे ई. त्यामुळे गुन्हेगारी या समस्येचा अध्यन करण्याच्या उद्देशाने अभ्यासकाने ष्भारतातील गुन्हेगारी समस्येचा समाजशास्त्रीय अध्ययनश् असा शोधनिबंधासाठी विषय निवडण्यात आलेला आहे.

**अध्ययन उद्दीष्टये :**

गुन्हयाची संकल्पना समजून घेणे

भारतातील गुन्हेगारीची कारणमिमांसा अभ्यासणे

भारतातील गुन्हेगारीवरील उपाय योजनांचा अभ्यास करणे

**गृहितकृत्ये :**

गुन्हेगारी ही जागतिक समस्या आहे.

लोकसंख्यावाढ दारिद्रय व बेकारी हे भारतातील गुन्हेगारीचे प्रमुख कारण आहे.

गुन्हेगाराला सुधारात्मक उपाय जास्त प्रभावी ठरतांना दिसुन येतात.

**अध्ययन पध्दती :**

प्रस्तुत शोधनिबंध लिहीण्यासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर केला असून यासाठी विविध संदर्भग्रंथ, लेख व क्रमिक पुस्तकांचा आधार घेतला आहे.

**गुन्हयाचा अर्थ व व्याख्या :**

गुन्हयांचा अर्थ समजून घेतांना विविध शास्त्रात वेगवेगळे स्पष्टीकरण केलेले आहे. उदा. धर्मशास्त्रात धर्मविरोधी वर्तन म्हणजे पाप होय असे म्हटले जाते. तर नितिशास्त्रामध्ये समाजमान्य नैतिक मूल्यांच्या विरोधी वर्तनाला अनैतिक वर्तन म्हटले आहे. कायदेशास्त्रामध्ये कायदयाविरोधी वर्तन म्हणजे गुन्हा म्हटले आहे. वैज्ञानिक दृष्टीकोनातून शास्त्रज्ञांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे.

डॉ. एम.जे. सेठना :- ष्गुन्हा म्हणजे असे कोणतेही कार्य किंवा दोष होय की जे संबंधित देशाच्या प्रचलित कायदयानुसार शिक्षेस पात्र आहेश्

इलियर आणि मेरील :- ष्गुन्हा म्हणजे कायदयाच्या विरूध्द होणारे वर्तन की, जे केल्यास मृत्युदंड किंवा कारागृहात, सुधारगृहात अथवा तत्सम जागी डांबुन ठेवण्याची शिक्षा दिली जातेश्

हर्टन आणि लेस्की :- ष्कायद्याचे कोणत्याही प्रकारे उलंघन म्हणजे गुन्हा होयश्

**गुन्हयाचे वर्गीकरण :**

गुन्हयाचे वर्गीकरण करतांना गुन्हयाचे स्वरूप, उद्देश, गांभिर्य इ. बाबी लक्षात घेऊन शास्त्रज्ञांनी गुन्हयाचे वर्गीकरण केले आहे. सदरलॅड या विचारवंताने गुन्हयाच्या स्वरूपावरून गंभीर गुन्हे आणि सामान्य गुन्हे असे दोन प्रकार सांगितले आहेत. तसेच वर्गव्यवस्थेला लक्षात घेऊन त्यांनी पांढरपेशीय गुन्हे व कनिष्ठ वर्गातील गुन्हे असेही दोन प्रकार सांगितले आहेत. बोंगर या शास्त्रज्ञाने आर्थिक गुन्हे, लैगिंक गुन्हे, राजकीय गुन्हे आणि विविध गुन्हे असे चार प्रकार सांगितले तर हेज या शास्त्रज्ञाने व्यवस्थेविरूध्द

गुन्हे, मालमत्तेविरूध्द गुन्हे, व्यक्तीविरूध्द गुन्हे असे तिन प्रकार सांगितले आहेत.

**गुन्हेगारांचे वर्गीकरण :**

लोम्ब्रोसो या मानसशास्त्राने गुन्हेगारांच्या शारिरीक रचनेवरून वर्गीकरण केले आहे. त्यानुसार जन्मजात गुन्हेगार, भावनाप्रधान गुन्हेगार, मनोविकृत गुन्हेगार व आकस्मिक गुन्हेगार असे चार प्रकार सांगितले आहेत. गुन्हेशास्त्रज्ञ आणि समाजशास्त्रज्ञ यांनी वयाच्या आधारावर बालगुन्हेगार आणि प्रोढ गुन्हेगार, अनुभवाच्या आधारावर - प्रथमच गुन्हा करणारे आणि सराईत गुन्हेगार, गुन्हेगारांच्या संख्येच्या आधारावर - एकटयाने गुन्हा करणे आणि संघटीतपणे गुन्हा करणारे असे वर्गीकरण केले आहे.

**भारतातील गुन्हयाची प्रमुख वैशिष्टये –**

भारतात गुन्हेगारीचे प्रमाण स्त्रियांच्या तुलनेत पुरूषांमध्ये अधिक आढळुन येते साधारणता पुरूष गुन्हेगारांचे प्रमाण ६७ टक्के तर स्त्री गुन्हेगारांचे प्रमाण ३ टक्के आढळुन येते.

भारतात सर्वात अधिक गुन्हे मुंबई महानगरात घडतात.

भारतात सायबर गुन्हे आणि आर्थिक गुन्हे यामध्ये दरवर्षी वेगाने वाढ होत आहे.

भारतात ग्रामिण भागापेक्षा शहरी भागात गुन्हयांची संख्या अधिक आहे.

अंमली पदार्थाच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील अवैध व्यापाराचे भारत हे केंद्र बनले आहे.

भारतात गुन्हेगारीमध्ये १८ ते ३० या वयोगटातील युवकांची संख्या अधिक म्हणजे ४६ टक्के आहे.

भारतात अल्पवयीन मुली आणि स्त्रियांचा अवैध व्यापारविषयक गुन्हयाच्या संख्येत दरवर्षी वेगाने वाढ होत आहे.

वरील प्रमाणे भारतातील गुन्हयांची वैशिष्टये सांगितली आहेत. दिवसेदिवस भारतात गुन्हा व गुन्हेगारीचे प्रमाण निश्चित वाढत आहे आणि हे देशासाठी अत्यंत घातक आहे. या गुन्हयांची संख्या वाढण्याची कारणे कोणती ते खालील प्रमाणे.

**भारतातील गुन्हयांची कारणे –**

गुन्हा ही एक सामाजिक तसेच जागतिक स्वरूपाची घटना आहे. दिवसेंदिवस संपुर्ण जगात गुन्हयांच्या प्रमाणात वाढ होत आहे. गुन्हा ही एक सामाजीक समस्या या दृष्टीने भारतातील गुन्हयांची कारणमिमांसा करणे आवश्यक आहे. तसेच अनेक विचारवंतानी गुन्हानिर्मितीच्या कारणांचा वेध घेऊन वेगवेगळया विचारसरणी निर्माण केल्या आहेत. त्या दृष्टीने गुन्हयांच्या कारणांचा खालीलप्रमाणे आढावा घेण्यात आला आहे.

**भौगोलीक कारणे –**

मनवी समाजातील व्यक्तीच्या जीवनाचे निर्धारण भौगोलीक घटाकांद्वारे होत असते. क्वेटलेट यांच्या मते पर्यावरण आणि गुन्हेगारी यांचा मानवी वर्तनात परस्पर सबंध आहे. उदा. क्वेटलेट यांच्या मते उष्ण प्रदेशात व्यक्तीविरोधी गुन्हे जास्त घडतात तर थंड प्रदेशात मालमत्तेविषयी गुन्हे अधिक घडतात. लोंब्रोसो यांनी सपाट भुप्रदेशामध्ये बलत्काराचे गुन्हे जास्त प्रमाणात घडतात असे म्हटले आहे. तसेच मनुष्यवधाचे गुन्हे जुलैत वाढलेले आढळते असेही त्यांनी म्हटले आहे.

**समाजिक कारणे –**

व्यक्तीच्या वर्तनावर सामाजिक परिस्थितीचा फार मोठा परिणाम पडतो. कोणतीही व्यक्ती ही जन्मजात गुन्हेगार नसते तर परिस्थिती कारणीभूत ठरते याबाबत सर्वत्र मान्यता प्राप्त झाली आहे. सामाजिक कारणामध्ये कौटुंबिक परिस्थिती, सामाजिक प्रथा परंपरा, वाईट संगत, चित्रपट, दुरदर्शन इ. कारणे जबाबदार असल्याचे निष्पण्ण होते. समाजातील सामाजिक आदर्श, मूल्ये व आचार विचार यांचाही गुन्हांशी संबंध असतो.

**लोकसंख्यावाढ–**

भारतातील वाढती लोकसंख्या हे गुन्हेगारीचे सर्वात महत्वपूर्ण कारण आहे. लोकसंख्यावाढीमुळे सर्वसामान्य व्यक्तीना प्रचंड संघर्ष करावा लागतो. अशा व्यक्तीकडुन अवैध कामे करून त्यांना एकप्रकारे गुन्हाकरण्यास बाध्य केले जाते ही वस्तुस्थिती आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे, बेरोजगारी, दारिद्रय, राहत्या घराची समस्या अशा विविध समस्यांना सामोरे जावे लागते.

**आर्थिक कारणे –**

समाजामध्ये आर्थिक विषमता ही गुन्हेगारीस जन्माला घालते. ग्रामिण क्षेत्रातील दुष्काळ, अनियमित पाऊस, वाढत्या किंमती इत्यादी कारणामुळे गुन्हेगारीच्या संख्येत वाढ होते. असे विधान प्रा. राधास्वामी यांनी केले आहे. गुन्हयासाठी जबाबदार आर्थिक घटक पुढीलप्रमाणे आहेत.

दारिद्रय –

दारिद्रयाच्या परिस्थितीमुळे व्यक्ती गुन्हे करते असे म्हटले जाते कार्लमार्क्सने म्हटले आहे की, सर्व सामजिक समस्यांचे मुळ आर्थिक विषमतेत आहे. ऑगबर्न यांनी दारिद्रय व गुन्हेयांचे परस्परसंबंध स्पष्ट करतांना म्हटले की, काही गरीब व्यक्ती गरजा पूर्ण करण्याकरीता चोरीसारखे गुन्हे करतात. बोंगर यांच्या मते दारिद्रयामुळे मानसिक आजार, संघर्ष, मद्यापन इत्यादी प्रवृत्तीमध्ये वाढ होऊन गुन्हेगारी प्रवृत्ती वाढते. सर्वच गरीब व्यक्ती या गुन्हेगार नसतात. गरीबीमुळेच नेहमी गुनहे घडतात असे नाही तर गुन्हे घडण्याची शक्यता मात्र वाढते.

**बेकारी–**

बेकारी हे एक गुन्हयाचे महत्वाचे कारण आहे. बेकारीमुळे व्यक्तीच्या मनात न्यूनगंड व नैराश्य निर्माण होते. काम करण्याची क्षमता असेत व इच्छाशक्ती सुध्दा असते परंतू त्यांना काम मिळत नाही तेव्हा व्यक्ती निराश होते बेकार व्यक्तीच्या अनेक गरजा असतात परंतू काम नसल्याने पैसा नाही त्यामुळे गरजापूर्ती करता येत नाही. त्यातूनच वाईट मार्गाचा अवलंब अशा बेकार व्यक्ती करतात. गरजापूर्ती त्यातुनच बेकार व्यक्ती गुन्हेगारी क्षेत्रात पदार्पण करतात.

**सामाजिक सांस्कृतीक घटक –**

व्यक्तीचे सामाजिकीकरण घडत असतांना सामाजिक परिस्थितीचा प्रभाव व्यक्तीच्या वर्तनावर पडतो. बरेच व्यक्ती सामाजिक परिस्थितीशी समायोजन करू शकत नाही. पर्यायाने अशा व्यक्ती गुन्हेगारी मार्गाकडे वळण्याची शक्यता अधिक असते. सामाजशास्त्रज्ञानी सामाजिक घटक हे गुन्हयाचे महत्वाचे कारण मानले आहे. यात कौटुंबिक परिस्थिती, सामाजिक विघटन, सामाजिक प्रथा परंपरा, वाईट संगत इ. घटकांचा अंतर्भाव होतो.

**मानसिक कारणे –**

काही व्यक्ती मानसिकतेने दुर्बल व विकृत असतात यामुळे त्यांच्याकडून विशिष्ट परिस्थितीत गुन्हा घडण्याची शक्यता असते. काही व्यक्ती आपल्या वर्तनावर नियंत्रण व संयम ठेवू शकत नाही तेव्हा अशा व्यक्तीकडुन गुन्हा होण्याची शक्यता जास्त असते. नैराश्य व भय या दोषांमुळे सुध्दा व्यक्ती चुकीचे वर्तन करण्याची शक्यता जास्त असते.

**वैयक्तीक कारणे –**

गुन्हयांच्या अनेक कारणामध्ये वैयक्तीक कारणे सुध्दा फार महत्वाची आहेत त्यात मद्यपान, शैक्षणिक दर्जा व वैवाहीक स्थिती या घटकांचा समावेश होतो. त्याचा थोडक्यात आढावा खालीलप्रमाणे

**मद्यपान –**

मद्यपान करणाऱ्या व्यक्तींचे व्यवहार वर्तन असंतुलीत असतात मद्यपान व अमलीपदार्थ सेवन केल्याने अनेक गुन्हे घडुन येतात. अशा व्यक्तीकडून बलात्कार, मारपीट करणे ई. सारखे गुन्हे घडून येतात.

**शैक्षणिक स्तर –**

अनेक गुन्हयांच्या अध्ययनात शैक्षणिक स्तर व गुन्हा यांचा परस्परसंबंध जोडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानुसार आशिक्षीत किंवा कमी शिक्षण घेतलेले गुन्हेगार यांचे प्रमाण जास्त आढळून आले तर उच्चशिक्षीतांचे प्रमाण कमी आढळुन आले.

**वैवाहीक स्थिती –**

व्यक्तीची वैवाहीक स्थिती आणि गुन्हा यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. गुन्हेगारांमध्ये विवाहितांच्या तुलनेत अविवाहीतांची संख्या अधिक आहे. गंभीर गुन्हे करणाऱ्यामध्ये अर्धे गुन्हेगार हे अविवाहित

असतात. घटस्फोटीत व विधुर गुन्हेगारांची सुध्दा संख्या अधिक असते.

वरील प्रमाणे भारतातील गुन्हेगारीचे कारणे विशद केलेली आहेत. याव्यतिरिक्त इतरही अनेक कारणे असू शकतात. गुन्हयांची संकल्पना समजून घेतांना गुन्हयांचा अर्थ, वैशिष्टये व कारणे यांचा अभ्यास करून चालणार नाही तर भारतातील गुन्हेगारी नियंत्रित ठेवण्यासाठी किंवा गुन्हेगारामध्ये सुधारणा घडविण्यासाठी काही उपाय योजना यांचाही आढावा घेणे क्रमप्राप्त आहे.

**गुन्हा प्रतिबंधात्मक उपाय –**

देशातील गुन्हयाला प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक आणि सुधारात्मक उपाय केले जातात. ते खालीलप्रमाणे.

**प्रतिबंधात्मक उपाय –**

समाजशास्त्रीय अध्ययनानुसार विशिष्ट सामाजिक परिस्थितीत गुन्हेगार निर्माण होतात. गुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण होण्यासाठी जी कारणे जबाबदार असतात त्या कारणांचे उच्चाटन करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय अंमलात आणले जातात. वेश्यावृत्ती आणि जुगार खेळणे हे दोन्ही अनैतिक व्यवहार आहेत. परंतू कायद्याने त्यांचे स्वरूप निश्चित केले की गुन्हयाची संख्या कमी होते. भारतातील गुन्हयाची अनेक कारणे आहेत त्यातील लोकसंख्या वाढीस आळा घालणे, आर्थिक व सामाजिक विषमता दुर करणे, बेरोजगारी, गरीबी दूर करणे हे सर्व प्रतिबंधात्मक उपाय अमलात आणले जातात.

**सुधारात्मक उपाय –**

गुन्हेगाराला शिक्षा करण्याऐवजी त्याच्या वर्तनात सुधारणा घडवून आणण्यासाठी सुधारात्मक उपाय केले जातात. गुन्हेगाराला शिक्षा मिळालीच पाहिजे याबाबत कोणाचेही दुमत नाही. शिक्षेमुळे गुन्हेगार हा पुन्हा गुन्हा करणार नाही तसेच इतर व्यक्तींना गुन्हा करण्यास आळा बसेल हा शिक्षेमागिल उद्देश आहे. गुन्हेगाराला नेमकी कोणती शिक्षा द्यावी याबाबत विविध मते आढळुन येतात. पुर्वी शारिरीक दंड, आर्थिक दंड, सामाजिक दंड व मृत्युदंड अशा शिक्षा मान्य करण्यात आल्या. गुन्हेगारांना शिक्षा करण्याऐवजी सुधारण्याची संधी मिळाली पाहिजे हा विचार भारताने स्विकृत केला यानुसार सुधारात्मक कार्यक्रम आखण्यात आला. त्यानुसार भारतात सुध्दा कारागृह, खुले कारागृह, परिविक्षा, अभिवचन इत्यादींचा समावेश सुधारात्मक कार्यक्रमात करण्यात आला.

**कारागृह –**

साधारणता ब्रिटिशांच्या काळात भारतात कारागृह व्यवस्था सुरू करण्यात आली. सुरूवातीच्या काळात गुन्हेगारांना कारागृहात फार अमानुष स्वरूपाची वागणूक देण्यात येत होती. कारागृह व्यवस्थेत सुधारणा घडवुन आण्यासाठी विविध समित्या स्थापन करण्यात आल्या. त्यांच्या शिफारशी लक्षात घेऊन इ. स. १८६४ मध्ये भारतीय कारागृह कायदा संमत करण्यात आला. तसेच इ.स. १९१९ मध्ये भारतीय कारागृह समिती स्थापन करण्यात आली. या समितीच्या शिफारशीनुसार कारागृह व्यवस्थेत सुधारणात्मक बदल करण्यात आले. जसे तुरूंगात कैद्याने केलेल्या कामाचा मोबदला मिळणे, अटीशर्तीनुसार नातेवाईकांना भेटण्याची मुभा, विविध सामाजिक उत्सव करण्यास मुभा इत्यादी सोयीची अंमलबजावणी करण्यात आली.

**खुले कारागृह –**

मनवतावादी विचारसरणीतून गुन्हेगारांच्या वर्तनात सुधारणा करण्यासाठी खुले कारागृह ही सुधारात्मक पध्दती स्विकारण्यात आली. भारतात इ.स. १९५२ मध्ये डॉ. संपुर्णानंद यांनी उत्तरप्रदेशामध्ये गृहमंत्री असतांना खुल्या कारागृहाचा प्रयोग केला. त्यांत त्यांनी चंद्रभागा नदीवर बांध घालण्याचे काम दोन हजार कैद्यांना देण्यात आले. या यशस्वी प्रयोगानंतर भारतात विविध ठिकाणी कैद्याकडून सडका निर्माण करणे, बांध घालणे इ. कामे खुल्या वातावरणात केल्या जातात. कैद्यांच्या शिबिरामधून विविध कामे त्याचेकडून करून घेतले जाते. या प्रकारात कैदी सर्वसामान्य लोकांसारखे स्वतंत्र राहतात. त्यांच्या कामाचा मोबदला दिला जातो.

त्यामुळे खुले कारागृह हे गुन्हेगारांच्या सुधारणा कार्यक्रमाचा महत्वाचा भाग बनले आहे.

**परिविक्षा –**

गुन्हेगाराला सुधारण्याचा एक उपाय म्हणजे परिविक्षा होय. प्रथमच गुन्हा केलेल्या गुन्हेगाराचे चारित्र्य, वय इ. लक्षात घेऊन काही अटी व शर्तीवर न्यायालय कारागृहात न पाठविणे यालाच परिविक्षा पध्दती म्हणतात. यात गुन्हेगाराला कारागृहात पाठविण्यापुर्वी प्रोबेशन अधिकाऱ्याच्या संरक्षणामध्ये ठेवून सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न करण्यात येते. गुन्हेगाराला कुटुंब व समाजापासून दुर न करता त्याच्यात सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न या पध्दतीतून केला जातो.

**अभिवचन–**

गुन्हेगार जेव्हा कारागृहात शिक्षा भोगत असते तेव्हा काही अटी शर्तीच्या आधारावर त्याची कारागृहातून सुटका करण्याच्या पध्दतीला अभिवचन किंवा पॅरोल म्हणतात. पॅरोलवर सर्वच कैद्यांना सोडले जात नाही. जे कैदी कारागृहातील सर्व नियमांचे योग्य पालन करतात व त्यांचे वर्तन समाधानकारक असते त्यांना पॅरोलवर सोडले जाते. पॅरोलवर सोडलेल्या व्यक्तीचे निरिक्षण परिविक्षा अधिकारी करीत असते.

**अनुरक्षण सेवा –**

गुन्हेगाराने कारागृहातील शिक्षा पूर्ण केल्यानंतर त्याला घरी जाण्यास सोडण्यात येते. घरी आल्यानंतर कुटुंबात किंवा समाजात त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन संशयी असतो. शिक्षा भोगून आल्यानंतर त्याला खऱ्या अर्थाने व्यावसायीक व सामाजिक पुनर्वसनाची आवश्यकता असते. अशा स्थितीत त्याला कामधंदा न मिळाल्यास परत तो गुन्हेगारी क्षेत्राकडे वळू शकते. म्हणून या अवस्थेत त्याला मदतीची फार गरज असते. याकरीता अनुरक्षण सेवा वसतिगृहे निर्माण करण्यात आलेली आहेत.

वरील प्रमाणे गुन्हेगारांसाठी सुधारात्मक कार्यक्रम अमलात आणलेला आहे.

**निष्कर्ष –**

गुन्हेगारीची समस्या ही केवळ भारतातीलच नाही तर ती जागतिक समस्या असल्याचे आढळुन येते.

लोकसंख्यावाढीमुळे रोजगाराची समस्या प्रचंड प्रमाणात वाढलेली असून जीवनातील संघर्षाला तोंड देण्यासाठी बरेचदा व्यक्ती गुन्हेगारीकडे वळतो.

गुन्हेगाराला शिक्षेऐवजी सुधारात्मक उपाय अधिक प्रभावी ठरतांना लक्षात येते.

**संदर्भ :–**

खडसे भा.की – भारतीय सामाजिक समस्या – श्री मंगेश प्रकाशन नागपूर १९९१

पाटे सुमन – भारतीय सामाजिक समस्या – विद्या प्रकाशन नागपूर २०००

लोटे रा.ज. – भारतीय समाज आव्हाने आणि समस्या – पिंपळापुरे ॲंड कं. पब्लीशर्स नागपूर २००६

कऱ्हाडे बी.एम. – भारतीय समाज प्रश्न आणि समस्या – पिंपळापूरे ॲंड कं. पब्लीशर्स नागपूर २००६

डॉ. धर्मवीर महाजन, डॉ. कमलेश महाजन – अपराधशास्त्र – विवेक प्रकाशन दिल्ली –७ – २००६

प्रा. घाटोळे रा.ना. – भारतीय समाजव्यवस्था, मंगेश प्रकाशन नागपूर १९८३